# <u>वृत्तपत्र सुचना</u>

डॉ.ई.बोर्जेस मार्ग व डॉ.एस.एस.राव मार्ग या मार्गांवर करण्यात येणाऱ्या सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे कामादरम्यान वाहन चालक व पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून नमुद ठिकाणावरील सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम पूर्ण होईपर्यंत खालीलप्रमाणे वाहतुकीवर २४ तास निर्बंध घालण्यात येत आहेत.

१) डॉ.ई.बोर्जेस मार्ग, दक्षिण वाहिनी, परमार गुरूजी मार्ग, गावकर चौक ते सुपारीबाग जंक्शनपर्यंत सर्व प्रकारच्या वाहतुकीकरीता २४ तास एकदिशा मार्ग (व्दम ॅल) राहील.

२) डॉ.ई.बोर्जेस मार्ग, उत्तर वाहिनी, सुपारीबाग जंक्शन ते परमार गुरूजी मार्ग, गावकर चौकापर्यंत सर्व प्रकारच्या वाहतुकीकरीता २४ तास प्रवेश बंद (छव म्दजतल) राहील.

३) डॉ.ई.बोर्जेस मार्ग, उत्तर वाहिनीवरील सुपारीबाग जंक्शन ते परमार गुरूजी मार्ग, गावकर चौकापर्यंत सर्व प्रकारची वाहतुक ही सुपारीबाग जंक्शन येथून डॉ.बी.ए.रोड–परेल टी.टी. जंक्शन–उजवे वळण–आचार्य दोंदे मार्ग–खानोलकर चौक–उजवे वळण डॉ.ई.बोर्जेस मार्ग–गावकर चौक या मार्गाने वळविण्यात येणार आहे.

४) डॉ.एस.एस.राव मार्ग, उत्तर वाहिनी, गोपाळ नाईक चौक ते आचार्य दोंदे मार्ग, हाफकिन संस्थेपर्यंत सर्व प्रकारच्या वाहतुकीकरीता २४ तास एकदिशा मार्ग (व्दम ॅल) राहील.

५) डॉ.एस.एस.राव मार्ग, दक्षिण वाहिनी, आचार्य दोंदे मार्ग, हाफकिन संस्था ते गोपाळ नाईक चौकापर्यंत सर्व प्रकारच्या वाहतुकीकरीता २४ तास प्रवेश बंद (छव म्दजतल) राहील.

६) डॉ.एस.एस.राव मार्ग, दक्षिण वाहिनीवरील आचार्य दोंदे मार्ग, हाफकिन संस्था ते गोपाळ नाईक चौकापर्यंत सर्व प्रकारची वाहतुक ही हाफकिन संस्था येथून आचार्य दोंदे मार्ग–खानोलकर चौक–डावे वळण–डॉ.ई.बोर्जेस मार्ग–सुपारीबाग जंक्शन–डावे वळण– डॉ.बी.ए.रोड, दक्षिण वाहिनी–भारतमाता जंक्शन–डावे वळण–गोपाळ नाईक चौक या मार्गाने वळविण्यात येणार आहे.

वाहन चालकांच्या मार्गदर्शनासाठी वाहतुक पोलीसांकडून वर नमुद ठिकाणी मार्गदर्शक फलक लावण्यात येतील. तसेच जनतेला मदत करण्यासाठी वाहतुक पोलीसांची नेमणूक करण्यात येणार आहे. जेणेकरून वाहन चालकांना कमीत कमी गैरसोय होईल व रहदारी सुरळीत चालू राहील.

सही/–

**( नंदकुमार चौगुले )**

पोलीस उपे आयुक्त (दक्षिण),

वाहतुक, मुंबई.

.............................................................................................